श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय:– **शुक्रवार दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी रथसप्तमी दिवशी भाविकांकरीता आयोजित महाप्रसादानिमित्त भोजन तयार करून वाढण्याच्या कामाच्या मजूरीसाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत**

शुक्रवार दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी माघी उत्सवात रथसप्तमी दिवशी मंदिराशेजारील संभाजी पार्क मैदानात मंडप उभारून अंदाजित ५००० भाविकांकरीता रात्रौ ८.०० ते रात्रौ १०.३० या कालावधीत महाप्रसादाच्या विशेष भोजनाची व्यवस्था करण्याचे न्यासातर्फे योजिले असून सदर भोजन तयार करून वाढण्याच्या मजूरीबाबत मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

## अटी व शर्ती

१) दरपत्रकामध्ये नमूद दिवसाकरीता मजूरीचे दर नमूद करणे आवश्यक आहे.

२) दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्चासह मूळ दर असावा व कर अतिरीक्त असा उल्लेख करावा.

३) प्रत्येक कंत्राटदाराने फक्त १ दरपत्रक सादर करावे.

४) कंत्राटदाराने सेवाकर क्रमांक (जी.एस.टी. क्र.) दरपत्रकात नमूद करावा.

५) स्वयंपाकाकरीता लागणारा सर्व कच्चा माल (किराणा माल), भाजीपाला न्यासातर्फे कंत्राटदारांना पुरविण्यात येईल.

६) अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या संपूर्ण पूर्वतयारीसह स्वयंपाक वाढणे, ताटे–भांडी धुणे, चपात्या/पुरी करणे व इ. कामे करणे तसेच स्वयंपाकाकरीता लागणारी सर्व भांडी, गॅस शेगडया, सिलेंडर, ५००० व्यक्तींकरीता जेवणाची ताटे, वाटया, टेबल–खुर्च्या, झालर (कव्हरसहीत), वॉश बेसिन, पर्याप्त मनुष्यबळ कंत्राटदारास आणावी लागतील, पुरविण्यात येणारे कामगार व्यवस्थित गणवेशात असणे आणि जेवण बनविताना स्वच्छतेबाबत विशेष काळजी बाळगणे आवश्यक राहिल

७) भोजनाचा दर्जा उत्तम व चांगल्या प्रकारचा असावा. तसेच या व्यवसायातील कमीत कमी पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे

८) कंत्राटदारास देयकाची रक्कम कंपनीच्या नावे आर.टी.जी.एस.द्वारे अदा करण्यात येईल.

९) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल. तसेच उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

१०) दरपत्रकधारकाने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकीत करुन सादर करावयाची कागदपत्रे

अ) आयकर नोंदणी पॅनकार्ड ब) सेवाकर जी एस टी नोंदणी दाखला

११) सिलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.

१२) दरपत्रके सिलबंद लखोटयात शनिवार, दि. १०.०२.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यत न्यासाच्या नोंदणी शाखेत सादर करावीत.

१३) शनिवार, दि. १०.०२.२०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंत्राटदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी कृपया उपस्थित रहावे.

Vpatil

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## दरपत्रकाचा तपशील

विषयः– शुक्रवार दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी रथसप्तमी दिवशी भाविकांकरीता आयोजित महाप्रसादानिमित्त भोजन तयार करून वाढण्याच्या कामाच्या मजूरीसाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत

नावः ______________________________________________

पत्ताः ______________________________________________

______________________________________________

पॅनकार्ड क्रमांकः ______________________________

जी एस टी क्रमांकः ______________________________

| अ. क्र. | कामाचा तपशील | व्यक्तींकरीता | एकत्र मजुरी दर रुपये (कर वगळून–सर्व समावेशक खर्चासह मूळ दर) |
|---|---|---|---|
| १ | माघी उत्सवात रथसप्तमी दिवशी भाविकांकरीता भोजन व्यवस्था रात्रौ ८.०० ते १०.३० वाजेपर्यंत | अंदाजित ५००० व्यक्तींकरीता | रुपये................................/– |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

विषय:– **शुक्रवार दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी रथसप्तमी दिवशी भाविकांकरीता आयोजित महाप्रसादानिमित्त भोजन तयार करून वाढण्याच्या कामाच्या मजूरीसाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत**

| अ. क्र. | पदार्थांचा तपशील |
|---|---|
| १ | साधा भात |
| २ | डाळ (साधे वरण) |
| ३ | कुर्मा भाजी, |
| ४ | गोड पदार्थ पायनॅपल शिरा |
| ५ | पुरी |
| ६ | कोशिंबीर, पापड, लोणचे, |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का